RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ८०]   सोमवार, जून २९, २०२६/आषाढ ८, शके १९४८   [पृष्ठे ०३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २४९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक २९ जून, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.**

क्रमांक संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७६/का-१२.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, (१८६९ चा १४) च्या कलम २२अ याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या जालना जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अंबड आणि दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, घनसावंगी या न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक ३ जुलै,२०२६ पासून असे निर्देश देत आहे की,

(अ) सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली गावे, जी यापूर्वी जालना जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अंबड यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमेत समाविष्ट होती, ती त्यातून वगळण्यात येऊन जालना जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, घनसावंगी यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमेमध्ये समाविष्ट केली जातील; आणि

(ब) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांमधून उद्‌भवणारे आणि उक्त दिनांकापूर्वी जालना जिल्ह्यातील अंबड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेले सर्व मूळ दिवाणी दावे आणि दिवाणी स्वरुपाची कार्यवाही, ही कायद्यानुसार निकाली काढण्यासाठी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, घनसावंगी यांच्याकडे हस्तांतरित केली जातील.

## अनुसूची

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अंबड, जि.जालना यांच्या अधिकारितेतून वगळून दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर घनसावंगी , जि.जालना यांच्या अधिकारितेत समाविष्ट करावयाच्या गावांची यादी.

| अ.क्र. | गावाचे नाव |
|---|---|
| १ | सौंधळगांव खु. |
| २ | तनवडी |
| ३ | पाडुळी |
| ४ | उढाण कंडारी |
| ५ | भनग जळगाव |
| ६ | भार्डी |
| ७ | एकलहेरा |
| ८ | रुई |
| ९ | बेलगांव |
| १० | बनगांव |
| ११ | दहेगांव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास वसंत गायकवाड,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 29th June, 2026.

*NOTIFICATION*

**Maharashtra Civil Courts Act.**

No. Sankirna 2025/CR 276/Desk XII.—In exercise of the powers conferred by section 22A of the Maharashtra Civil Courts Act ( XIV of 1869), and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the local limits of ordinary jurisdiction of the Court of Civil Judge, Junior Division, Ghansawangi and the Court of Civil Judge, Junior Division, Ambad in Jalna District, subordinate to the District Court Jalna; the Government of Maharashtra, with effect from the day of 3rd July 2026, hereby directs that,

*(a)* the villages specified in the Schedule appended hereto, which were heretofore included within the local limits of the ordinary jurisdiction of Civil Judge, Junior Division at Ambad , be excluded therefrom and be included within the local limits of the ordinary jurisdiction of Civil Judge, Junior Division at Ghansawangi in Jalna District; and

*(b)* all original civil suits and proceedings of civil nature arising out of the villages mentioned in the Schedule appended herewith pending before the said date in the Court of Civil Judge, Junior Division Ambad shall stand transferred to the Court of Civil Judge, Junior Division, Ghansawangi in Jalna District for disposal according to law.

*Schedule*

(List of villages excluding from the jurisdiction of Court of Civil Judge, Junior Division, Ambad in District Jalna and included in the jurisdiction of the Civil Judge, Junior Division, Ghansawangi in District Jalna).

| Sr. No. | Name of Village |
|---|---|
| 1 | Saudalgaon Khurd |
| 2 | Tanwadi |
| 3 | Paduli |
| 4 | Udhan kandari |
| 5 | Bhanang Jalgaon |
| 6 | Bhardi |
| 7 | Eklahera |
| 8 | Rui |
| 9 | Belgaon |
| 10 | Bangaon |
| 11 | Dahegaon |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS V. GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to
Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.